**ठळक बातम्या**

- देशाच्या सर्वात वजनदार दूरसंवाद उपग्रह सीएमएस-३चं यशस्वी प्रक्षेपण

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषदचं उद्घाटन /१ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना निधीचा करणार प्रारंभ

- कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरमधे शासकीय महापूजा संपन्न

- भारत-ऑस्ट्रेलिया टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर ५ गडी राखून विजय

**आणि**

- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत आणि दक्षिण अफ्रिका लढत सुरु /भारताच्या सलामी जोडीची शतकी भागीदारी

**<><><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आज आंध्र प्रदेशातल्या श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून सीएमएस-३ या देशाच्या सर्वात वजनदार दूरसंवाद उपग्रहाचं प्रक्षेपण केलं. एलव्हीएम-३ या देशातल्या सर्वात शक्तिशाली उपग्रह प्रक्षेपकाच्या सहाय्यानं त्याचं प्रक्षेपण करण्यात आलं. अवकाशात ४ किलो पर्यंत वजन वाहून नेण्याची त्याची क्षमता असून, या प्रक्षेपकानं चांद्रयान-३ सारख्या मोहिमा यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

सीएमएस-३ हा लष्कराचा मल्टी-बँड दूरसंवाद उपग्रह असून, त्याला जीसॅट--7 आर असंही म्हणतात. हा उपग्रह भारतीय भूभागासह लगतच्या महासागराच्या विस्तृत क्षेत्रात सेवा देईल, असं इस्रोनं आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. सीएमएस-३ उपग्रह भारतीय नौदलाच्या संपर्क यंत्रणेत लक्षणीय सुधारणा घडवेल.

तसंच तो उच्च-क्षमतेची बँडविड्थ देखील प्रदान करेल, त्यामुळे दुर्गम भागांशी डिजिटल माध्यमातून संपर्क साधता येईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली मध्ये उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५ चं उद्घाटन करतील. या कार्यक्रमात ते देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना निधीचा प्रारंभ करतील.

शिक्षणतज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकार मधल्या ३ हजारापेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणं, पॅनेल चर्चा, सादरीकरणं आणि तंत्रज्ञान विषयक प्रदर्शनं आयोजित केली जातील. देशाची विज्ञान आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे योग्य व्यासपीठ ठरेल.

**<><><><><>**

कार्तिकी एकादशीनिमित्त आज विठ्ठल मंदिरांमधे गर्दी झाली आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केल्या जाणाऱ्या या उत्सवाबद्दल अधिक माहिती ऐकूया

---- VC- - - (१.३४ सेकंद)

*(कार्तिक शुद्ध एकादशी हा चातुर्मासाचा समारोप मानला जातो. आषाढी एकादशीपासून सुरु केलेली अनेक व्रत वैकल्यं आणि उपक्रमांचं उद्यापन केलं जातं. आषाढ शुद्ध एकादशीला निद्रधीन झालेले देव आज कार्तिक एकादशीला जागे होतात अशी लोकधारणा आहे. आषाढीप्रमाणेच कार्तिकी एकादशीला देखील पंढरपूरची वारी केली जाते. कार्तिकी एकादशी निमित्त आज पहाटे पंढरपूर इथं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विठ्ठलाची शासकीय महापूजा सपत्नीक केली. राज्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांवरचं संकट दूर करावं असं साकडं शिंदे यांनी विठुरायाला घातलं.*

***होल्ड बाईट शिंदे***

*यावेळी मानाचे वारकरी म्हणून नांदेड जिल्ह्यातले रामराव आणि सुशिलाबाई वालेगावकर या दांपत्याला विठ्ठलाची महापूजा करण्याचा मान मिळाला. विशेष म्हणजे यंदा जिल्हा परिषद शाळेतल्या दोन विद्यार्थ्यांनाही पूजा करण्याचा मान देण्यात आला. मानाच्या वारकऱ्यांना राज्य परिवहन-एसटीचा मोफत पास आता एक वर्षा ऐवजी कायमस्वरूपी देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. एकादशीमुळे पंढरपूरात पहाटेच लाखो भाविकांनी चंद्रभागा नदीत पवित्र स्नान केलं. महाराष्ट्रासह, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि इतर राज्यांतून सुमारे आठ लाख भाविक पंढरपूरात दाखल झाले असून 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषानं परिसर दुमदुमला. )*

**<><><><><>**

६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं आज मुंबईत उद्घाटन झालं. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, आणि ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार तसंच प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांच्या पथकाने आपली कला सादर केली.

कोविड काळात खंड पडलेल्या या संगीत संमेलनाला आजपासून पुनःप्रारंभ झाला. येत्या २९ नोव्हेंबरपर्यंत देशभरातल्या २४ आकाशवाणी केंद्रांवर वेगवेगळ्या दिवशी हिंदुस्तानी, कर्नाटक शैलीतलं शास्त्रीय संगीत तसंच सुगम आणि लोकसंगीत अशा विविध परंपरांमधले कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या प्रचाराची समाप्ती दोन दिवसांनी होणार असल्यानं आता प्रचार शिगेला पोहोचला असून.

भाजपाचे स्टार प्रचारक आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आज पाटण्यात रोड शो झाला. नवादा इथल्या सभेत त्यांनी एनडीए सरकारच्या काळात बिहारमध्ये सुशासन प्रस्थापित झाल्यानं राज्याच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळाल्याचं

सांगितलं. गृहमंत्री अमित शहा यांनी वैशाली जिल्ह्यात महुआ इथं प्रचारसभा घेतली. तर मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी सहारसा जिल्ह्यात सभा घेतली. ते म्हणाले की, राजद आणि काँग्रेसच्या काळात राज्याची परिस्थिती अत्यंत दयनीय होती, मात्र त्यांच्या सरकारच्या काळात बिहारनं विकास आणि शांततेचा मार्ग धरला आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी खगरिया इथल्या सभेत, महाआघाडीला सत्ता मिळाली तर शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या क्षेत्रांवर भर देण्याचं आश्वासन दिलं. समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी छपरा इथं महाआघाडीच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ सभा घेतली. पहिल्या टप्प्यात १२१ मतदारसंघांसाठी ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारची हिंसाचाराची कृती खपवून घेतली जाणार नाही आणि मतदार शांततेत आणि मुक्तपणे मतदान करू शकतील, असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी कानपूर इथं बातमीदारांना सांगितलं.

**-होल्ड-**

मुख्य निवडणूक आयुक्त : ज्ञानेश कुमार (१९ सेकंद)

**<><><><><>**

भारत-ऑस्ट्रेलिया टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेत आज ऑस्ट्रेलियात होबार्ट इथं झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ५ गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. ऑस्ट्रेलियानं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १८६ धावा केल्या. भारतातर्फे अर्शदीप सिंगनं ३, तर वरुण चक्रवर्तीनं २, तर शुभम दुबेनं एक गडी बाद केला.

भारतानं ५ गडी गमावून १८८ धावा करत, सामन्यातले ९ चेंडू बाकी असताना  विजयी लक्ष्य पार केलं. वॉशिंग्टन सुंदरच्या नाबाद ४९ धावांचा त्यात मोलाचा वाटा आहे. जितेश शर्मानं नाबाद २२ धावा केल्या. अर्शदीप सिंग सामन्यातला सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला.

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज नव्या मुंबईत डी वाय पाटील मैदानात भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात अंतिम लढत सुरु आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या सलामी जोडीनं शतकी भागीदारी केली. भारताची धावसंख्या १०४ झाली असताना स्मृती मंधाना ४५ धावांवर बाद झाली. पावसामुळे खेळ उशिरा सुरु झाला. दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या  ४६ षटकात ५ बाद २७७धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तीन दिवसांच्या उत्तराखंड दौऱ्यासाठी आज देहरादून इथं पोहोचल्या. उत्तराखंडचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल गुरमित सिंग आणि मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर त्या हरिद्वार इथं पतंजली विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात त्या सहभागी झाल्या. भारतीय पारंपरिक ज्ञानशाखांच्या संपन्नतेचं महत्त्व त्यांनी सांगितलं.

**.. होल्ड - बाईट- राष्ट्रपती**

राष्ट्रपती देहरादून इथं पादचारी पुलाचं उद्घाटन केलं.  उद्या त्या उत्तराखंड विधानसभेच्या विशेष अधिवेशनाला संबोधित करणार आहेत तसंच नैनिताल राजभवनाला १२५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

मोसमी पाऊस भारतीय उपखंडातून रवाना झाल्यानंतरही देशाच्या विविध भागात पाऊस होत आहे. अरबी समुद्रात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आता निवळला असल्याचं हवामान विभागानं सांगितलं. मात्र यंदाचा नोव्हेंबर महिना तुलनेने थंड असेल असा अंदाज आहे.

**<><><><><>**

उद्योग आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर न्यायच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नाशिक आणि अमरावती या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक ‘सी-ट्रिपल आयटी’ केंद्र शासनानं मंजूर केलं आहे. या अंतर्गत, ‘सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग अर्थात, संशोधन, नवसंकल्पना आणि उद्योजकता वाढीला लावण्याकरता मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्र सुरु होणार आहे.

**//<><><><><>//**